# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक :- १२४-२२ दिनांक :- ०२/०५/२०२२

## ए.टी.एम. कार्डची अदलाबदल करुन लोकांची फसवणुक करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला अटक करण्यात माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.

दिनांक २६/०४/२०२२ रोजी तक्रारदार श्री. मुगदा विजय सराधी, वय ३८ वर्षे हे ए.टी.एम. सेंटरमध्ये पैसे काढण्यासाठी गेले असता एका अनोळखी इसमाने पैसे काढण्यास मदत करतो असे सांगुन त्यांचेकडील ए.टी.एम. कार्ड घेवुन हातचलाखी करुन ए.टि.एम. कार्डची अदलाबदल करुन पिनकोड चोरुन दुसऱ्या ए.टी.एम. मधुन रु. २६,००/- रक्कम काढुन घेतली. सदरबाबत तक्रारदार श्री. मुगदा सराधी यांनी तक्रार दिल्याने माणिकपुर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १५३/२०२२ कलम ४२० भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

माणिकपुर पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने तांत्रीक मदतीच्या आधारे सदर गुन्हयातील आरोपीचा २४ तासाच्या आत शोध घेवुन आरोपी नामे तुषार अनिलभाई कोठारी, वय ३० वर्षे, रा. भाईलाल दादा की सोसायटी, चारोतार बॅंक समोर, जुना रस्ता, आनंद, गुजरात यास हॉटेल इंपेरीयल, अंधेरी पुर्व येथुन सापळा रचुन शिताफीने अटक केली आहे.

आरोपीच्या अंगझडतीमध्ये वेगवेगळया बॅंकेचे एकुण १५ ए.टि.एम. कार्ड मिळुन आले आहेत. आरोपीने यापुर्वी वसई, पालघर, ठाणे, मुंबई, नवीमुंबई, गुजरात, इत्यादी ठिकाणी गुन्हे केल्याची माहीती दिली आहे. तसेच यापुर्वी आरोपीविरुध्द महाराष्ट्र व गुजरात राज्यामध्ये एकुण १८ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, श्री. प्रदीप गिरीधर, सहाय्यक पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली श्री. राजेश ओझा, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी स.पो.नि. सचिन सानप, पो.उ.नि. रोहिणी डोके, पो.ह. शैलेश पाटिल, पो.ह. शामेश चंदनशिवे, पो.शि. गोपाळ कोळेकर व पो.शि. प्रविण कांदे यांनी केलेली आहे.